# रोशन - भाग १



उत्तम मद्य, चांगलं चुंगलं खाणं, तसंच दिलखुलास हास्य ह्या तीन गोष्टी संगीतकार रोशन यांच्या आवडीच्या होत्या. ह्यांच्या अंमलाखाली त्यांनी कित्येक गीतांना भन्नाट संगीत दिले. खरे खोटे देव जाणे परंतु असे ऐकीवात आले की मित्रांच्या समवेत मद्याचे घुटके घेत असताना त्यांनी हार्मोनियमवरून बोटे फिरवण्यास सुरुवात केली. निघणाऱ्या सुरांवर स्वत:च खूप फिदा होऊन 'वाह ! वाह !' करीत त्यांनी स्वत:चीच तारीफ करण्यास सुरुवात केली. मित्रपरिवार देखील 'क्या बात है!' असे कौतुक करू लागला तेव्हा ते थोडेफार हुरळूनच वर बोट दाखवीत विचारू लागले की आत्ताचे स्वर त्याने पेश केले की मी मद्यधुंद झालो आहे? तेव्हा एक मित्र म्हणाला, "बहुधा तुमच्या या अवस्थेत तो वरचा तुमच्याकडून सुरेख सूर सादर करतोय." तेव्हा संगीतकार म्हणाला, "बहुधा तो माझ्या पठडीतला असला पाहिजे" आणि सर्वजण पुन्हा मद्यात बुडाले.

रोशन (संपूर्ण नाव रोशनलाल नागरथ) यांचा जन्म आता पाकिस्तानात असलेल्या गुजरानवाला येथे १४ जुलै १९१७ रोजी झाला. एका श्रीमंत बांधकाम व्यावसायिकाच्या घरी त्यांचा जन्म झाला होता पण संपूर्ण घराण्यात कुणालाही संगीताची आवड नव्हती. परंतु बालपणीच्या काही प्रभावाखाली त्यांना वैभवातून (संगीत) रागाकडे ओढून नेले. हे प्रभाव कोणते होते हे काळाच्या ओघात विरून गेले. त्यांना उर्दू अवगत होती आणि उर्दू वाङ्मय आणि उर्दू काव्यातील नजाकतींची पूर्ण जाण होती. त्यांच्या पालकांनी त्यांना मास्टर मनोहर बर्वे यांच्याकडे संगीताचे धडे घेण्याची व्यवस्था केली. पुढे लखनौ येथे त्यांना उस्ताद अल्लाउद्दीन खाँ तसेच पंडीत रातंजनकर यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनी गायनात प्रगती तर केलीच पण बरीच वाद्येही ते शिकले. ते दिलरुबा उत्कृष्टपणे वाजवीत असत.

या घेतलेल्या संगीत शिक्षणामुळे ऑल इंडिया रेडिओ, दिल्ली येथे गायक आणि वादक म्हणून त्यांना सहजपणे नोकरी मिळाली. आता त्यांनी संगीताच्या शिकवण्याही सुरू केल्या आणि त्यांच्या शिष्यांपैकी 'इरा' नावाच्या एका शिष्येबरोबर पुढे त्यांनी विवाहही केला. चित्रपट आणि संगीत यांसाठी दिल्ली ही जागा योग्य नसून त्यासाठी मुंबईला प्रयाण करणेच उचित ठरेल हे त्यांच्या लवकरच लक्षात आले. त्यामुळे ते मुंबईला आले. परंतु त्यांना हे नवे शहर फारसे आवडले नाही. येथे सांस्कृतिक चळवळी कमी आणि व्यापार उदीमच जास्त होता. मुंबईत येण्यापूर्वी ह्या शहरापेक्षा कमी व्यावसायिक शहरांमध्येच त्यांचे जास्त वास्तव्य असावे, त्यामुळे घरच्या आठवणीने बेचैन होऊन त्यांनी पुन्हा दिल्लीचा रस्ता पकडला.

गीतांना उत्तमोत्तम संगीत देण्याची आपली ओढ, आस संपलेली नाही आणि ती मनीषा पूर्ण झाल्याखेरीज आपल्याला मुळी चैनच पडणार नाही हे त्यांना लवकरच उमगले. मग यासाठी मुंबईला परत जाण्याखेरीज पर्यायच नव्हता. ही १९४८ सालची गोष्ट आहे. आणि पुढे किदार शर्मांशी ज्या दिवशी भेट झाली तो दिवस रोशनलाल यांच्यासाठी भाग्यदायी ठरला. तुमच्या लक्षात असेलच की गीतकार-कम-चित्रपट निर्माता किदार शर्मा यांच्याकडे 'अंगभूत नैपुण्य' ओळखण्याचे भिंगच होते. रोशन यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट 'नेकी और बडी' हा किदार शर्मांचाच होता. परंतु तो १९४९ च्या बॉक्स ऑफिसवर दणक्यात आपटला. पहिल्या प्रवासाला प्रयाण केलेल्या टायटॅनिक बोटीसारखाच त्यांचा पहिल्याच पदार्पणातील चित्रपट साफ कोसळला. रोशनलाल पुन्हा बाडबिस्तरा घेऊन दिल्लीला परतण्याचा विचार करीत असतानाच किदार शर्मांनी त्यांना 'बाँवरे नैन' हा दुसरा चित्रपट दिला. हा चित्रपट मात्र यशस्वी ठरला. या पहिल्या दोन चित्रपटांत त्यांचे नाव रोशनलाल असे देण्यात आले होते. 'बाँवरे नैन' मध्ये त्यांनी केदार शर्मांच्या पुढील गीतांना संगीत दिले होते:
१. खयालोंमे किसीके इस तरह (गीता रॉय आणि मुकेश)
२. मुझे सच सच बता दो क्या? (राजकुमारी आणि मुकेश)
३. मेरे रुठे हुए बालमा (राजकुमारी)
४. तेरी दुनिया मे दिल लगता नही (मुकेश)
५. सुन बैरी बालम, सच बोल (राजकुमारी)
६. मुहब्बत के मारोंका हाल (रफी-आशा)

१९५० च्या आजूबाजूला रोशन यांनी ह्या चाली बांधल्या होत्या. त्यांचा रोख मधुर सुगम संगीताकडे होता. ऑर्केस्ट्राचा कमीत कमी वापर करण्यावर त्यांचा भर होता. वरील सगळ्या गाण्यांत बासरीचा सुरेख वापर करण्यात आला होता. तसेच दोन प्रकारचे ताल वापरण्याची कल्पना त्यांनी फारच यशस्वीपणे राबवली. एक स्थायी तर दुसरा अंतऱ्यासाठी.

१९५१ मध्ये शर्मांचा 'बेदर्दी' आला परंतु त्याच्या संगीतात जान नव्हती. परंतु त्याच वर्षी झिया सरहद्दी यांचा 'हम लोग' आणि मुकेशचा 'मल्हार' हे दोन चित्रपट रोशन यांच्या नावे प्रदर्शित झाले. 'हम लोग' मध्ये ऑर्केस्ट्राचा वापर करून रोशन यांनी गण्यामध्ये ठेका आणला. 'छन छन छन बाजे पायल मोरी' (अकॉर्डियन आणि ढोलकच्या सहाय्याने पायाचा ठेका धरायला लावणारे लताचे गाणे), 'अपनी नझरसे उनकी नझर तक' ह्या मुकेशच्या आणखी एका ठेक्यातील गाण्यात अकॉर्डियन, बासरी, व्हायोलिन्स आणि अगदी सारंगी या सर्वांचे सूर कोळून घेतल्यासारखे वाटतात. 'बहे अखियोंकी धार' (लता), 'दिल की परेशानियाँ' (मुकेश - स्पॅनिश गिटारचा सुरेख उपयोग), 'चली जा, चली जा' हे लताचे गाणे ही सगळी गाणी अप्रतिमच म्हणावी लागतील. शेवटच्या गाण्यात लता रोशनच्या ताफ्यात नव्यानेच आली होती. असे असूनही त्यांनी तिच्या गळ्यातून इतके कारुण्याचे सूर कसे उतरवले कळतच नाही. त्यांनी पुन्हा एकदा 'गाये चला जा' या लता आणि दुरानी यांच्या कोरस सहितच्या गाण्यामध्ये दोन प्रकारची लयबध्दता (ताल) साधण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु खरे तर, त्यांच्या आजवरच्या गाण्यांतील अजूनही आवडण्याजोगे गाणे म्हणजे 'बुगी बुगी बुगी - यो - यो - यो' हे शमशाद आणि दुरानी यांनी गायलेले रॉक अँड रोल गाणे.

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician's role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book "Talat Mahmood, The Velvet Voice" was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com